महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १८४ वे दिनांक : २९/०६/२०२६ वार : सोमवार

## नाव 'देवाभाऊ' असो वा 'नमो', आमचा विरोध तत्त्वालाच - अंजली दमानियांचा घणाघात




**मुंबई** : राज्यात नव्याने सुरू करण्यात येत असलेल्या टॅक्सी योजनेवरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'देवभाऊ टॅक्सी'चे नाव बदलून 'नमो टॅक्सी' केले असले, तरी या योजनेमागील आर्थिक अनियमितता आणि राजकीय श्रेयाची लढाई लपून राहत नाही, असा घणाघात दमानिया यांनी केला आहे. यासोबतच, या योजनेचे काम ज्या संस्थेला दिले जात आहे, ती एक 'शेल' (बोगस) कंपनी असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी पुराव्यांनिशी केला आहे.
या योजनेच्या नामकरणावरून सरकारला धारेवर धरताना दमानिया म्हणाल्या, "कदाचित मी आक्षेप घेतल्यामुळेच 'देवभाऊ टॅक्सी'चे नाव बदलून 'नमो टॅक्सी' करण्यात आले असावे. पण नुसते नाव बदलून काय साध्य झाले? नाव 'नमो' असो वा 'देवभाऊ', आमचा मूळ विरोध या तत्त्वाला आहे. सार्वजनिक जनतेच्या पैशातून राबवल्या जाणाऱ्या योजनांना राजकारण्यांची नावे देणे पूर्णपणे अयोग्य आहे."

केंद्राच्या टॅक्सी सेवेचा दाखला देत अंजली दमानिया यांनी भाजपच्या अंतर्गत राजकारणावरही थेट निशाणा साधला. "केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच देशव्यापी 'भारत टॅक्सी' सेवा सुरू केली आहे. मग महाराष्ट्र सरकार हीच योजना राज्यात का राबवत नाही?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.
देशातील 28 राज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेशांनी जर आपापली वेगळी टॅक्सी सेवा सुरू केली, तर कसे चालेल? देवेंद्र फडणवीस आणि अमित शाह यांच्यात काही 'कोल्ड वॉर' सुरू आहे का? असा रोखठोक सवाल करत त्यांनी नेत्यांना आपापसात न भांडण्याचा सल्ला दिला.
'भारत टॅक्सी' ही एका देशी नावाने आणि देशव्यापी नेटवर्कने चालणारी योजना आहे. फडणवीस आणि प्रवीण दरेकर यांनी महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' न आणण्यामागचे कारण स्पष्ट करावे. राजकीय श्रेयापेक्षा जनसेवा मोठी असते, हे सरकारने समजून घ्यायला हवे, असे त्या म्हणाल्या.

अंजली दमानिया यांचा दुसरा आणि अत्यंत गंभीर आक्षेप या योजनेच्या आर्थिक पारदर्शकतेवर आहे. ज्या संस्थेच्या माध्यमातून ही योजना राबवली जाणार आहे, त्या 'देवदत्त वाहतूक व पर्यटन सहकारी संस्थे'चा बुरखा फाडताना त्यांनी धक्कादायक माहिती दिली. या संस्थेच्या बँक खात्यात सध्या शून्य रुपये शिल्लक आहेत. संपूर्ण वर्षभरात या संस्थेच्या खात्यातून केवळ 246 रुपयांची उलाढाल झाली आहे. नियमांची पायमल्ली करत, या संस्थेने गेल्या 25 वर्षांत एकदाही अधिकृत निवडणूक घेतलेली नाही.

अशा एका बोगस आणि 'शेल' सहकारी संस्थेचे नाव बदलून 'नमो टॅक्सी' ठेवल्याने तिची मूळ पात्रता आणि आर्थिक स्थिती बदलत नाही, असे दमानिया यांनी स्पष्ट केले. तसेच, जर मुंबई बँकेकडून (मुंबै बँक) याच संस्थेला कर्ज उपलब्ध करून दिले जाणार असेल, तर आमचे सर्व आक्षेप कायम राहतील, असा थेट इशाराही त्यांनी दिला.
"लोकांना केवळ नावांत बदल नकोय, तर खऱ्या अर्थाने सेवेत बदल हवा आहे," असा टोला अंजली दमानिया यांनी लगावला आहे. त्यांच्या या आरोपांमुळे टॅक्सी योजनेवरून राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात नवा वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## हा वाघचा कातडं पांघरलेला लांडगा निघाला, उद्धव ठाकरेंचा निंबाळकरांवर हल्लाबोल



**धाराशिव** : महाराष्ट्राच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर'च्या माध्यमातून शिवसेनेत दुसरे सर्वात मोठे बंड पाहायला मिळाले असून, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे गटाचे ६ खासदार फोडून त्यांना शिवसेनेत प्रवेश देण्यात आला आहे. शिंदेंकडून उद्धव ठाकरेंना देण्यात आलेला हा दुसरा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर आक्रमक झालेल्या उद्धव ठाकरे यांनी थेट या ६ फुटीर खासदारांच्या मतदारसंघात दौरे सुरू करून त्यांच्यावर जोरदार निशाणा साधायला सुरुवात केली आहे. याच दौऱ्याचा भाग म्हणून आज धाराशिवमध्ये खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरेंची जाहीर सभा पार पडली, ज्यामध्ये संजय राऊत यांनी सर्वप्रथम ओमराजेंवर सडकून टीका करत जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, उद्धव ठाकरे फिरत नाही म्हणतात उद्धव ठाकरे फिरायला लागले की काय होत ते महाराष्ट्र बघतोय. या सभा नाही, या माझ्या कौटुंबिक बैठका आहेत, यांनी कितीही आमदार फोडू दे, तुमच्या उरावर भगवा फडकवल्याशिवाय मी राहणार नाही. लोकसभा निवडणुकांवेळी, समोरच्यांकडून पैशांचा पाऊस पडत होता, तेव्हा या गद्दारासाठी एका शेतकऱ्याने त्याच्याकडचे पैसे निवडणुकीसाठी दिले. गद्दाराच्या सभेला मी आलो होतो तेंव्हा एक गरीब शेतकरी आला आणि म्हणाला, मला खासदारला पैसे द्यायचे आहेत. काय भाषण काय देत होता... माझा फोन नंबर घ्या म्हणायचा, मी फोन करायला लागलो तर फोन उचलायचा नाही. मग, मी कैलासला म्हणालो अरे हा तर फोन उचलत नाही, असे म्हणत ओमराजे निंबाळकरांवर ठाकरेंनी निशाणा साधला आहे.

पुढे उद्धव ठाकरे सांगतात की, याच एक भाषण होतं, त्या भाषणात तो म्हणाला, खंडोजी खोपडे, सूर्याजी पिसाळ म्हटलं तर आपण कोणाचं नाव घेतो. आता, तुझ्यावरील गद्दारीचा शिक्का कसा पुसणार? मी जेंव्हा याच्या प्रचारसाठी आलो होतो तेव्हा म्हणालो होतो दोन वाघ माझ्याकडे आहेत. मात्र, त्यातला हा वाघचा कातडं पांघरलेला लांडगा निघाला.

उद्धव ठाकरे म्हणाले, या मिंदेसेनेला भवितव्य काय आहे? मग हे खासदार तिकडे का गेले? कारण भाजपमध्ये गटबाजी सुरू असून त्यांचं ऑपरेशन देवेंद्र सुरु आहे. काही दिवसात देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदाची खुर्ची दुसऱ्या कोणाला दिली तर आश्चर्य वाटणार नाही. देवेंद्र फडणवीस दिल्लीचे स्वप्न पाहत आहेत, संघ सुद्धा पंतप्रधान पदासाठी देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा देईल, मग माझं काय होईल यासाठी हे खासदार देवेंद्र फडणवीस यांना न देता बाजूला ठेवले. २०२९ पर्यंत पंतप्रधानपदाचे जे चेहरे असतील त्यांचा पत्ता कट केला जाईल, अशी टीका ठाकरेंनी केली आहे.

## TET पेपरफुटी प्रकरणी तिघांना अटक : ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी

**मुंबई** : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला भिवंडी पोलिसांकडून मोठी गती मिळाली आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तीनही आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले. सखोल तपासासाठी पोलिसांनी दहा दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या संपूर्ण प्रकरणामागे एक मोठे आंतरराज्यीय रॅकेट सक्रिय असल्याचा दाट संशय असून, गुन्ह्यातील आणखी दोन मुख्य आरोपी फरार असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.

टीईटी पेपरफुटी प्रकरणात पकडण्यात आलेले धीरज बलराज सिंग (वय २८, रा. हरियाणा), राजीव साव (वय ४५, रा. बिहार) आणि आकाशकुमार स्वराजकुमार (वय ३०, रा. बिहार) या तीन आरोपींना रविवारी भिवंडी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील न्यायाधीश एस. एम. सुतार यांच्या सुट्टीकालीन न्यायालयात हजर करण्यात आले. तपासादरम्यान या आरोपींकडून टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याची महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांनी न्यायालयाला दिली. तसेच, या गुन्ह्यामागील आंतरराज्यीय साखळी उघडकीस आणण्यासाठी व फरार असलेल्या दोन संशयितांना पकडण्यासाठी कोठडीची आवश्यकता असल्याचे पोलिसांनी न्यायालयात स्पष्ट केले.

हा पेपर नेमका कुठून आणि कसा लीक झाला, महाराष्ट्रात तो आणखी कुठे कुठे विकला गेला आहे का, यातील आर्थिक व्यवहार कशा प्रकारे व कोणासोबत झाले आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचे लागेबांधे आहेत, या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिसांनी न्यायालयाकडे १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. प्रकरणाचे गांभीर्य आणि तपासाची व्याप्ती लक्षात घेऊन न्यायालयाने पोलिसांची बाजू ऐकून घेतली व आरोपींना ८ दिवसांची म्हणजेच ६ जुलैपर्यंतची पोलिस कोठडी मंजूर केली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ जून २०२६


## सामाजिक चळवळीतला शाहीर हरपला



**उमरगा** : जाणीव संघटना या सामाजिक चळवळीमध्ये स्वतःला समर्पित करणारी, कथा, गीत, काव्य, शाहिरी निर्माण करून गाणारी महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा पिंजून काढून गरिबी, दारिद्य, जातीयता, जातीय विषमता, धर्मांधता, रोजगार, पाणी, लोकांचे प्रश्न यावरती लढणारी, समाज जागृती करणारी, अशी ती योग्िनी सुभाष तगारे त्यांनी आज इह लोकीचा निरोप घेतला. प्रेम आणि पतीनिष्ठा, प्रपंच आणि सामाजिक कार्य करणारी अनेकांच्या मधील ती एक होती.. पथनाट्याच्या माध्यमातून 1991 साली पूर्ण महाराष्ट्रामध्ये गावागावात, तालुक्यात जिल्ह्यातून रान पेटवणारी, समाजमन घडवणारी, युवकांना संघटित करत, बाल मनावरती संस्कार करण्यासाठी अभिरुची वर्गाच्या माध्यमातून हजारो बालकांच्या शिक्षणासाठी, झटणारी कष्टनारी आनंदयात्री अशी ती. एक विचारवंत, सामाजिक चळवळीतला महामेरू. अशा या थोर योगिनीताई तगारे यांना मानाचा मुजरा करतो.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## मुरूममध्ये १२ वा राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न...




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : क्रांतीसूर्य, समतानायक जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती उत्सवानिमित्त बसव प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित १२ वा राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार वितरण सोहळा रविवारी (ता. २८) रोजी रत्नमाला मंगल कार्यालयात अत्यंत थाटामाटात आणि उत्साही वातावरणात पार पडला. समाजकार्यासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती आणि दीपप्रज्वलनया सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील होते. यावेळी औसाचे उद्योजक श्रुनक उटगे, नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश अर्दाले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश मंगरुळे, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, रशिद शेख, रोटरीचे माजी अध्यक्ष गोविंद पाटील, दत्ता बिराजदार, नगरसेवक राजेंद्र बेंडकाळे, रूपचंद गायकवाड, गणेश अंबर, अहमद मिनियार आणि सुनील ख्याडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या सोहळ्यात बापूराव पाटील व मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील सत्कारमूर्तींना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल, फेटा आणि पुष्पहार देऊन गौरविण्यात आले. राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार राजेंद्र पाचंगे, प्रकाश कांबळे, वीरभूषण लिमये तर राज्यस्तरीय पुरस्कार पंकज शहाणे, आशा कांबळे, दीपक शिंदे, डॉ. बालाजी बिराजदार, विठ्ठल चारे, रतन कटके, इरफान मुजावर, उल्हास घुरघुरे, राहुल मुळे, भारत सातपुते, मुस्तान मिर्झा, तानाजी भालेराव, कुमारी लव्या वाघमारे, विक्रम दासमे आणि तुळजाभवानी संघर्ष समितीचे सर्व सदस्य. यावेळी तीन शाळेतील ४०० गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे प्रतिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती कविवर्य भारत सातपुते, डॉ. बालाजी बिराजदार, आशाताई कांबळे यांनी आपल्या मनोगतातून कृतज्ञता व्यक्त करताना पुरस्कारांमुळे मिळते सामाजिक कामाची ऊर्जा, या पुरस्कारांमुळे भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते. हा सन्मान केवळ वैयक्तिक नसून तो आमच्या सामाजिक बांधिलकीच्या कार्याची पावती आहे, असे त्यांनी सांगितले. नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी, बसव प्रतिष्ठानचा हा उपक्रम समाजाला योग्य दिशा देणारा असून, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी तो प्रोत्साहनाचा असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बसव प्रतिष्ठानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी या सोहळ्यामागची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार अजिंक्य मुरूमकर यांनी मानले. या सोहळ्यासाठी मुरूम शहर व परिसरातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जे.ई.एस. महाविद्यालयात संत कबीर जयंतीनिमित्त 'बहता समीर, गाता कबीर' या संगीतमय कार्यक्रमाचे आज आयोजन.

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांच्या सहकार्याने हिंदी आंदोलन परिवार, पुणे, राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्ट, जालना, हिंदी विभाग जे.ई.एस. महाविद्यालय, जालना आणि कलावर्धिनी, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संत कबीर जयंतीनिमित्त 'कबीर दर्शन' या विषयावर आधारित एक विशेष संगीतमय कार्यक्रम 'बहता समीर, गाता कबीर' आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी सायंकाळी 6.00 वाजता जे.ई.एस. महाविद्यालयाच्या चुन्नीलाल जी गोयल सभागृहात होणार आहे.

'क्षितिज' निर्मित या कार्यक्रमाचे लेखक, दिग्दर्शक व सूत्रधार संजय भारद्वाज असून, संत कबीर यांच्या विचारांचे संगीत, निवेदन आणि सादरीकरणाच्या माध्यमातून रसिकांसमोर प्रभावी दर्शन घडविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे सहसंचालक तथा सदस्य सचिव सचिन निंबाळकर जालना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री पुरुषोत्तमजी बगडीया, सचिव मा. श्री श्रीनिवासजी भक्कड यांची विशेष उपस्थिती राहणार असून, राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्टचे अध्यक्ष शिवकुमार बैजल, प्रसिद्ध लेखिका सौ. रेखा बैजल, जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, हिंदी विभागप्रमुख डॉ. नानासाहेब गोरे तसेच कलावर्धिनी, जालनाचे सर्व सदस्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

संत कबीर यांच्या समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक प्रबोधनाच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या विशेष संगीतमय कार्यक्रमास जालन्यातील सर्व रसिक व साहित्यप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन या कार्यक्रमाच्या संयोजन समितीचे सदस्य एड. विष्णुपंत नाईक, डॉ. प्रवीण चंदनशिवे, डॉ. मानसी लोखंडे, डॉ. सुजाता रगडे, प्रा. किशोर खरात आणि डॉ. सुप्रिया जोशी यांनी केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ जून २०२६

# यशोदीप तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२६ परीक्षेत घवघवीत यश

**छत्रपती संभाजीनगर :** यशोदीप नॉलेज हब (तंत्रनिकेतन) येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (MSBTE) उन्हाळी २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे. कम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग (AI & ML) विभागातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण प्राप्त करत संस्थेचा नावलौकिक उंचावला आहे.कम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग- नवल राजेश – ८२.२०% (प्रथम)- मोहन सोळंके व युवराज राठोड – ७२.६०% (द्वितीय)- अक्षरा डोंगरे – ७०.८०% (तृतीय)आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग (AI & ML) विभाग- दिनेश चापे – ७८.४७% (प्रथम)- चेतन जाधव – ७५.००% (द्वितीय)- आयशा शेख – ७३.७७% (तृतीय)इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग- संध्या घाटोळ – ८३.१८% (प्रथम)- ओंकार सुराशे – ७९.१८% (द्वितीय)- भक्ती थोरे – ७७.४१% (तृतीय)प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. चंद्रकांत येवले सर, प्रशासकीय अधिकारी श्री. श्याम कुलकर्णी, अकॅडमिक डीन श्री. मिलिंद कुलकर्णी, प्राचार्य प्रा. प्रवीण माळी, शैक्षणिक समन्वयक प्रा. श्रावण वनजे, प्रा. विकास आडे, प्रा. मंजुषा पाटील, प्रा. सागर धामणकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.यशोदीप नॉलेज हब (तंत्रनिकेतन) परिवाराकडून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## वटपौर्णिमा (विनोदी कविता)

वटपौर्णिमेचा आला सण,
साऱ्या बायका निघाल्या आनंदान.
साडी, बांगड्या, कुंकू भारी,
वडपूजेला निघाल्या सारी.

दारुड्याची बायको झाली तयार,
हातात पूजा, चेहऱ्यावर भार.

जाताजाता पुटपुटली, हसत हसत ..
"कधी मरतोय हा... कंटाळले बाई मी!
नुसता बसतोय ढोसत!"

दुसरी म्हणाली, "अगं थांब जरा,
आज तरी देवासमोर नवस कर बरा!"

ती म्हणे, अगं"व्रत करते मी रिवाजासाठी,
बाकी इच्छा आहे माझ्या मनापासूनच तो
जाण्यासाठी!"

म्हणे, "सावित्रीचं नाव घेतेस,
आणि यमराजाला अर्ज देतेस!"
तेवढ्यात नवरा तिथेच आला,
डगमगत येऊन वडालाच टेकला.

म्हणे, "बायको, सात जन्म साथ दे,
पण आधी शंभर रुपये हातात दे."

बायको म्हणाली, "आधी दारू सोड,
मगच संसाराचा धर तू दोर.

रोजच नशेत घर डोक्यावर घेतोस,
आणि सकाळी काहीच झालं नाही
म्हणतोस."

यमराज म्हणाले, "थांबा जरा,
माझ्याकडेही आहे कामांचा पसारा.
असा दारूडा नको माझ्या दारी,
आधी सुधारू दे त्याला घरी."

वडाच्या पानांनी टाळ्या वाजवल्या,
साऱ्या बायकांनी हास्यधारा लावल्या.

## एका पावसाच्या सरीने

उन्हाच्या झळा लागून,
झाडीवेली गेली सुकून.
एका पावसाच्या सरीने,
मरगळ गेली उडून.
पावसाच्या सरी येता,
झाले पेरणीला सुरू.
थेंब थेंब पाऊस पडता,
शेती पाणी लागले मुरू.

काळया काळया मातीतून,
पहा बीज टरारून आले.
पाहता पाहता शेतामध्ये,
कोवळे रोप पावसाने न्हाले.

शेतातल्या पिकासंगे,
लाविला पावसाने लळा.
लळा लावुनी पिकाला,
छान फुलविला मळा.

मळा फुललेला पाहून,
सारे आनंदित झाले.
पाहता पाहता कळेना,
पीक बहरून आले.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# बिबखेड येथे वन अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई, ट्रॅक्टर जप्त




**कन्नड (अरुण थोरात) :** प्रादेशिक वनविभागा च्या बिबखेडा जवळील जंगलात वन अतिक्रमण करणारा ट्रॅक्टर धडक कारवाई करत दि.२८ जून रोजी जप्त केला आहे. कन्नड प्रादेशिक वनपरिक्षेत्रातील पेडकवाडी नियतक्षेत्रातील बिबखेडा च्या राखीव वनकक्ष क्रमांक १३० मधील ०१ हेक्टर वनक्षेत्रावर अवैध ताबा मिळवून ट्रॅक्टरने नांगरणी करत असल्याची गुप्त माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन भारतीय वनअधिनियम, १९२७ नुसार कारवाई करून ट्रॅक्टर जप्त केला आहे.सदरील कारवाई वनसंरक्षक छ. संभाजीनगर प्रमोदचंद लाकरा, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सहा. वनसंरक्षक विशाल कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली, वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड (प्रा.) शिवाजी टोंपे यांच्या नियोजनात, वनपाल कळंकी संजय कादी यांच्या नेतृत्वाखाली व वनरक्षक पेडकवाडी अजिनाथ नागरगोजे, वनसेवक शेख सईद मकसूद व इतर वनसंरक्षण मजूर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. प्रथमदर्शनी आरोपी सुभाष कचरू गांगुर्डे व बळीराम श्रावण सोनवणे यांच्या विरुद्ध वनगुन्हा नोंद करून कारवाईत पकडलेले ट्रॅक्टर जप्त करून ताब्यात घेतले व मक्रणपूर नर्सरी मध्ये लावण्यात आले. पुढील तपास वनपाल कळंकी संजय कादी करित आहेत.

*सध्या पेरणीचे सीजन असल्याने अतिक्रमण होण्याची दाट शक्यता लक्षात घेऊन कन्नड प्रादेशिक वनपरिक्षेत्राचे सर्व वनअधिकारी व कर्मचारी सतर्क राहून राखीव वन जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांचे सर्व प्रयत्न हाणून पाडत आहेत. सर्व ट्रॅक्टर मालक व चालक यांना आवाहन करण्यात येते की, आपल्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने राखीव वन जमिनीवर अतिक्रमण करत असल्याचे आढळून आल्यास आपले ट्रॅक्टर जप्त करून कडक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. कोणत्याही प्रकारचे वनगुन्हा होत असल्यास वनविभागाला कळवावे. माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल.*

- शिवाजी टोम्पे,
वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड

# पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकरांच्या उपस्थितीत बीबीएफ (BBF) तंत्रज्ञानाद्वारे लागवड




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** तालुक्यातील मौजे कसर येथे कृषी विभागाच्या वतीने बीबीएफ (Broad Bed Furrow - रुंद वरंबा सरी) तंत्रज्ञानाचा वापर करून सोयाबीन लागवड प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परभणी जिल्ह्याच्या सन्माननीय पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी प्रमुख उपस्थिती लावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आणि स्वतः शेतात जाऊन या आधुनिक पेरणी पद्धतीची पाहणी केली. हवामानातील अनिश्चिततेच्या काळात पिकांचे नुकसानटाळण्यासाठी आणि सोयाबीन उत्पादनात वाढ करण्यासाठी 'बीबीएफ' तंत्रज्ञान अत्यंत फायदेशीर ठरत आहे. या पद्धतीमुळे अतिवृष्टी झाल्यास पाण्याचा योग्य निचरा होतो आणि कमी पाऊस पडल्यास जमिनीत दीर्घकाळ ओलावा टिकून राहण्यास मदत होते, असे प्रतिपादन यावेळी पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी केले. तसेचतालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहनही त्यांनी केले. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती: या प्रात्यक्षिक कार्यक्रमाप्रसंगी कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित राहून त्यांनी शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. यावेळी प्रामुख्याने:किशोर खिस्ते,अभिजीत पारवे, माधव दराडे, आत्माराम पवार, विठ्ठल शिंदे सरपंच कसर, नितीन घुगे (तालुका कृषी अधिकारी) सुनील कदम (मंडळ कृषी अधिकारी) स्वप्निल देशमुख (सहाय्यक कृषी अधिकारी) गजानन घुगे (सहाय्यक कृषी अधिकारी) यांच्यासह कृषी विभागाचे इतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान तालुका कृषी अधिकारी श्री. नितीन घुगे यांनी बीबीएफ यंत्राची कार्यपद्धती आणि बीजप्रक्रियेचे महत्त्व याविषयी शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी मौजे कसर आणि परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ जून २०२६

# ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची : वैश्विक विचारांची धारदार कविता




कवीवर्य साक्षेपी समीक्षक डॉ महेश खरात यांच्या अक्षर लेखणीतून तथागत गौतम बुद्धांच्या त्रिशरण पंचशीलांच्या मध्यम मार्गाने एक निस्सीम श्रध्देय भावनेची उच्च विभूषित ज्ञानीवंत प्रज्ञावंताची लेखनी हाती आल्यावर ही प्रखर वास्तवाची नोंद घेणारी ओळ आहे.परिवर्तनाचे चक्र फिरवाणाऱ्या हाताना ही मनोज्ञ सचाईचं मनोगत मनात तरंग उठविते कारण आज सर्वहारा वंचित बहुजन समाज शिक्षित झाला आहे आणि डॉ बाबासाहेबांच्या विचारांचे निर्भयपणे आचरणातून आले म्हणजे ही ओळ नव्या विचारांची,आचारांची,व प्रचारांची आहे.आम्ही आमच्या प्रज्ञेचा शोध घेऊन आमच्या मनाची धारणा पक्की म्हणजे ज्ञान कौशल्य आत्मसात केले ही 'ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची आहे' ही कविता संयत मनोभूमिकेतून आल्याने कृतज्ञतेचा भाव व्यक्त करते.हा सोहळा गुरू गौरवाचा आहे ज्यांनी ही ज्ञानसाधना करूवून घेतली.माजी कुलगुरू डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेचा आशिष अनुबंध असा "समतेसाठी संघर्षाचा शब्द होणारी कविता म्हणजे महेश खरातांची कविता आहे.स्वातंत्र्य समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यामूल्यांच्या आधारेच सामाजिक पुनर्निर्मिती होते; परंतु त्यासाठी संघर्ष करावा लागतो.हा संघर्ष व्यवस्थेशी, संस्कृतीशी, धर्माशी आणि धर्माने केलेल्या भाकड कथांशी संघर्ष करावा लागतो.याची जाणिव महेश खरात यांची कविता देते"(पृ.सोळा)या कवितेना मर्मग्राही अनुबंध म्हणजे आज जे सुजाण जाणतेपण आले आहे पण या व्यवस्थेला डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व संवैधानिक संविधान अभ्यासातून एक समतेचा वारसदार म्हणून ही ओळ अतिशय वळणदार मार्ग दाखवते.कारण वाचन लेखन व श्रवण या गोष्टीचं बहूजनांच्या वाटेवरच्या नव्हत्या.ज्ञान प्रकाशांच्या वाटा जेव्हा उजळून निघाल्या तेव्हा वंचिताची पहाट झाली.म्हणून ही ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची आहे.माणसाला माणसाची ओळख करून देणारी ही देखणी ओळ आहे.कारण हातात लेखणी आणि मनगटात देखणी ताकद म्हणजे बाबासाहेबांचे वैश्विक विचार ही कविता संयत मनोभूमिकेतून देऊन जाते.तू माझा सांगाती तथागत भगवान गौतम बुद्ध याचे सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने त्रिशरण पंचशीलांच्या तत्वांचे अधिष्ठान व क्रांतीसुर्य व महात्मा फुले यांचे प्रखर वास्तववादी शेतकऱ्यांचा आसूड,व अखंड या विचार धारेची प्रेरणा या ओळी मागे आहे.नाहीतर अजून ही ब्राह्मणाचे कसब चालूच आहे.एवढी अंधश्रद्धा रूढी परंपरेचा पगडा कायमचं आहे.ही कविता संयत मनोभूमिकेतून ही अस्सल ठणक मांडते.'चक्र परिवर्तनाचे' या ठळक विभागात मनापासून मनाच्या खोल तळापर्यंत ही कविता पोटतिडकीने ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची अशी हाक देते.नाहीतर कुठली बोळ अन् कुठले खोळ घेऊनचं फक्त भूकेसाठी हातात कटोरा असता आता तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची ओळ बाबासाहेबांनी दिली तिचे अलौकिकत्व हे काळाला ही मिटवता येतं नाही ती म्हणजे बाबासाहेबांची लेखनी. संविधान एक विचारधारेचा प्रजासत्ताक कायदा त्याचाच हा वैचारिक फायदा या ओळी मुळे होतो आहे.'कवीला का बरे झाला असेल हर्ष 'इथल्या प्रंचड कोलाहल आणि जीवघेण्या प्रवासात ही हे भंयकर अवकाळी चाळे पाहून कवी"तेवढ्यात पिशवीतील चारदोन कवितेनी केली चुळबुळ/आणि त्या माझ्याशी म्हणाल्या/खरंच दु:खाना होतो का असा स्पर्श?/कवीला का बरं झाला असेल हर्ष "(पृ.२५)ही कविता मोठा संयत विद्रोही होते त्याचे असे की, इथल्या समाजव्यवस्थेतेचा लोच्या भंयकर टोलच्या घेऊन निघाला आहे.तशा काही प्रतिमा प्रतिके असे 'समतेच्या पोटावर आसूड, विषमतेच्या तालावर तांडव नृत्य,भूर्मूट्या मुरमाड खरतूढ जमीन,आरतीला भोक, माणुसकीची गाणी जातियवादी गातो आहे,जातीअंताचा लढा लढणे हे एक ढोंग आहे.धर्मग्रंथाची कडी,ही कविता अतिशय प्रखर जातीच्या कुचकट भावनेचा छुप्या पद्धतीने सर्वेक्षण करून हे मुखवटे उजगर करते."धारधार सुळ्याच्या अंकुशाला/चिपाड होतांना हसत राहतो/मस्तक रक्तबंबाळ होते/पण मेंदूत लोच्या होतं नाही/आणि अजूनही पिंडावरच्या नैवेद्याला/बगळा टोच्या देतन नाही"(पृ.३२) कवीच्या चिंतन चिकित्सकेला एक सृजनशील अभ्यासक बुद्धत्वांच्या विचारांची लय आहे.उच्च विभूषित ज्ञानीवंत झाल्यावर एक नव्या दृष्टीचा आशावाद कवीला दिसला आजतागायत आपलं आयुष्य बापजांद्याच्या पिढ्या मातीशी इमान घेऊन जगल्या त्या केवळ भूईशी नीष्ठ वगाव शिवाराचा माथा म्हणून पण शिक्षण हे शस्त्र मिळाले आणि 'अशाचं छताखाली गाईन मी'यातील संयत संखेद वेदना कवी मोठ्या दिलाशाने मांडतो आहे आजच्या मानवी प्रवृत्ती ही जातीच्या विकृतीची सीमा ओलांडून नवे डावपेच खेळते आहे.या कवितेची शृंखला अशी "ढुंगणात शेपूट घालून वाघानेचं शेळीप्रमाणे जगून हे तत्वज्ञान झुठ ठरविले.मग मी उगाच दात ओठ खात मारल्या चारदोन फुल्या धर्मग्रंथाच्या पानावर"(पृ.३४)ही इतकी भंयकर उद्विग्न करून जाते ही कविता."नव्या जगासाठी/जेथे बुद्धभूमी नसेल युध्दाची/अन् युद्धभूमी नसेल बुद्धांची/जिथे सर्वांनाचे मिळेल चार मिळेल पाणी/अशा छताखाली गाईन गाणी (पृ.३८)हे अतिशय तरल संयत भावनेतून रूदन येते आहे म्हणजे आज तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची ओळ काय आहे?आपण विविधतेने नटलेल्या देशांचे प्रजासत्ताक संविधानाचे पाईक आहोत आम्हीच आमच्या जातीच्या कुचकट द्वेष करतो आहोत.ही देवळं,राऊळ, मंदिर मस्जिद याचे स्तोम माजवतो आहोत.तथागंताच्यासम्यक दृष्टींचा विचार व्हावा.फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारांची बांधिलकी ही माणुसकीची माणगंगा आहे.या कवितेचा मर्मग्राही आस्वाद घेतला तर महाभारत, पुराणं ग्रंथाचे दाखले देत ही कविता येते.आता कुठे हा सर्वहारा बहुजन वंचित जागा होतो आहे तर,त्याची पुन्हा शासकीय निमशासकीय कोंडवाड्यात दमकोंडी होते आहे.कारण त्याला जातीयतेच्या पाळूत चेंमटून घ्यावे लागते आहे.'फरक काय?'कुंती,द्रोपदी,सीता,सती सावित्री या केवळ दु:ख यातना सहन करणाऱ्या स्त्रिया होत्या.कवीने आधुनिक भारतीय गौरवंकित स्त्रीयांचा दाखला दिला आहे.त्या खऱ्या प्रेरणा प्रेरक आहेत.युगानुयुगापासून ही 'कुटिल नीती'पंढरीच्या पांडुरंगाच्या पायरीवर आजतागायत चालू आहे.संताच्या जातीची वाटणी इथल्या व्यवस्थेनं केली आहे.'तुक्या तुझ्या अभंगानं इंद्रायणीला वेड केलं'या कवितेचा आशय तितकाचं मर्मग्राही आहे.या मानसाच्या डोक्यातली जातं जावी माणूस म्हणून माणसाकडे पाहता यावं.झाडं झुडपं पशू पक्षी पाणी हे कधीच मातीला विसरत नाही.इथं माणुसकी रसातळाला गेली आहे म्हणून 'माणूस होण्यासाठीचे हेच खरे पेज' ही कविता अतिशय मोकळेपणाने आशय सांगते ज्ञान,न्याय,समता मूल्य, श्रुती, स्मृती,"माझ्या हाताच्या बोटावर पंचशीलांच्या मुद्रीका आहेत/अन् तळहातावर दातृत्वाची रेषा/अन् आभाळभर कर्तृत्वाची भाषा/मी ठेवतो ओठांवर बुद्धाचं हस्य/अन् चेहऱ्यावर महावीरांचे तेज/माणूस होण्यासाठी हेच खरे पेज"(पृ.५९)अशी ही अस्सल ज्ञानप्रज्ञेची कविता कवीचा स्वानुभव स्वानंद देऊन जाते.यासाठी या सिस्टिममध्ये माणूसकीचा व्हायरस दिला पाहिजे असा आशावाद ही कविता देऊन जाते.'भीम घेऊन जावा'ही एक ठसठसणारी आजची आम्ही उच्चविद्याविभूषित बहुजन अहोत.महामानवाचे अभिवादन करताना.दबक्या आवाजात 'जयभीम'म्हणतो.ही पांढरपेशी लाज कवीने सखेद व्यक्त केली आहे.कारणमी अजूनही या उच्चभ्रू वर्गाचा मी सरकारी गुलाम आहे.ही माझी तुमची आमची मानसिकता कविने खाडकन गालफाडात देऊन उघडं केली आहे.म्हणून महेश खरात सरांची ही कविता संयत विद्रोहीची ओळ आहे.'सुरकुतलेल्या चेहऱ्याआड'या विभागात माय, कष्ट, भाकर,शेतीमाती आणि वसा वारसा चालविणारे, कष्टवंत हात त्यांची ऋणाई व्यक्त केली आहे.जसे' भाकर साखर झाली"जवा माय बोलायची,'सर्वांची आय उरो,जिजे,हे सारं आहेच पण "मायच्या सुरकुतलेल्या चेहऱ्याआड/वाताड झालेल्या कातडी खालून/सतत वाहत राहतं/बुद्धांच्या करूणेसारखं अनाम दु:ख/तिच्या वेदनेची कोणतीच कळ पोहचत नाही/आरपार आत्म्यापर्यंत...(पृ.९१)'माय' या कवितेत एक सृजनशील स्नेहाळू भावतरंग या कवितेने दिला आहे.तर क्रांतीज्योती सावित्रीमाई यांच्या दुरदृष्टीचा अनुबंध प्रकाशमान केला आहे.आपल्या आजोबांच्या जीवन संघर्षाचा शब्द निर्धार शब्दांगार या कवितेतून येतो.जातापात धर्मपताका न मानता केवळ श्रेध्दय भावनेचा हा माणुसकीचा गहिवर या कवितेने दिला आहे.'पासवर्ड आनंदाचा' हा निर्लेप नितळ निस्पृह श्रद्धेय भावनेतून हा मायाळू माणूसकीचा ओलावा आहे.खरचं या जगण्याचे सारं ज्यांना कळाले तो सुखी समाधानी व आनंदी.सुखाच्या पाठीमागे लागून दु:खाच्या भळभळणाऱ्या आसक्तीच्या खपल्या घेऊन धावणाराला कधीच आनंद मिळत नाही.म्हणून ही 'ओळ आहे तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची'कवी महेश खरात यांची पाठराखण जेष्ठ समाजसेवक भालचंद्र कानगो लिहितात "महेश खरात यांची कविता परिवर्तनाचे चक्र गतिमान करू पाहतेय.जात, धर्म,वर्णाधारीत विषमतेवर परखडपणे बोट ठेवतो.भेदभाव करणारी व्यवस्था, त्याला नाकारायची आहे.म्हणून तो या सर्वांसंबधी प्रपंच राग,चिड संताप व्यक्त करतो.वेश्यांच्या व्यथा, अंधश्रद्धेवर भाष्य नोंदवत जातो.तुकाराम, बाबासाहेब, यांच्याशी संवाद साधत साधत ही कविता माणुसकीची गाणे गाऊ लागते.आणि 'माणसाच्या गावात भीम घेऊन जाण्याचे काम करते'(ब्लर्ब)हे अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समीक्षण भाष्य आहे हे या कवितेचं मोठेपण.'लोकवाड्मय गृह'या ख्यातनाम प्रकाशनाचे ही देखणी बांधणी आहे.यातील रेखाटने श्रेष्ठ जेष्ठ श्रीधर अंभोरे व श्रावणी साठे यांची आहे.मुखपृष्ठ भारती हिंगणे अतिशय आशय संपन्न झाले आहे.प्रा. डॉ महेश खरात सरांची ही कविता म्हणजे परिवर्तनाचा अस्सल हुंकार आहे.



**पुस्तक:-'ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची'(कवितासंग्रह)**
**लेखक:-कवी महेश खरात (संभाजीनगर)**
**प्रकाशक:- लोकवाड्मय गृह, मुंबई**
**प्रथमावृती:-९नोव्हेंबर २०२५**
**किंमत:-१२०**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना1**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ जून २०२६


# वटसावित्रीची पौर्णिमा साजरी करताना

**आ**पला भारत विविधतेने नटलेला,थटलेला आहे.इथल्या भाषा, इथली संस्कृती,इथले लोक,इथला समाज, इथल्या जाती, इथली माती इथली नातीगोती खूप वेगळेपण जपत जपत ही संस्कृती पुढे पुढे चालत आहे. वटसावित्री पौर्णिमा या सणाचे निमित्ताने आपण थोडे चिंतन करणार आहोत. वटसावित्री पौर्णिमा भारतभर हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.सौभाग्यवती महिला ह्या सणात सहभागी होतात. त्याच वेळेला ज्यांचे पती वारले आहेत त्या विधवा महिलांची दिवसभर घुसमट होताना आम्ही सगळे जण पाहत असतो. आणि या दु:खाचा सरावही करून घेत असतो नव्याने विधवा झालेल्या महिलांच्या मनाची काय स्थिती होत असेल याचा अंदाज तरी आम्ही करतो काय??सत्यवानाच्या मृत्यूनंतर त्याला वाचवीण्यासाठी केलेली तपश्चर्या आणि देवाने दिलेला आशीर्वाद यामुळे सत्यवानाला जीवदान मिळालं..... वास्तविकता हे ऐकण्यासाठी, वाचण्यासाठी खूप चांगले आहे.परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार केल्यानंतर माणूस जेव्हा मरतो, तेव्हा तो पुन्हा कधीच जिवंत होत नाही. आणि असं कधीच घडत नाही. आज तरी विज्ञानानी हे सिद्ध केलेल आहे.भारतीय संस्कृतीमध्ये जे जे सन अंधश्रद्धा पसरविण्यासाठी काम करतात ते ते सण बहुजन समाजातल्या लोकांनी नाकारले पाहिजे.त्याची सुरुवात आम्हीच करायला हवी. आम्ही सण का साजरा करतो सना दिवशी सर्वांना गोड धोड खाता यावं, आनंदित राहता यावं.आनंद उत्सव साजरा करता यावा. यासाठी सण साजरा करीत असतो. पण हा सण घरातल्या विधवांना दिवसभर अस्वस्थ करणारा, दु:खाच्या डोंगरात लोटणारा, बुजून गेलेल्या दु:खाच्या आठवणींचा अंगार फुलविनारा आहे. तर सौभाग्यवतींना आनंद देणारा आहे.असे सुख आणि दु:ख याचं समीकरण असणारा सन आमच्या घरात कसा साजरा होऊ शकतो? ज्या सणाच्या भोवताली अंधश्रद्धेचा डोलारा उभा आहे.एका बाजूला एका महिलेला आनंद तर दुसऱ्या महिलेला दु:ख देणारा.असे सण असतील तर ते हळूहळू कालबाह्य ठरवावे लागतील. त्याची सुरुवात बहुजन समाजातील लोकांनीच करावीच लागेल.दुसरा आणि महत्त्वाचा भाग ग्रामीण भागामध्ये जिथे वडाचे झाड आहे त्या ठिकाणी महिला हाच नवरा सात जन्मी मिळू दे म्हणून केविलवाणा प्रयत्न करत असतात.यासाठी प्रार्थना करतात. मला प्रश्न पडतो की ज्या नवऱ्यांना कमवता येत नाही. आनंदाने जगता येत नाही. तो दुसऱ्याला जगू देत नाही. नशेच्या अधीन गेलेला माणूस प्रॉपर्टी विकतो, नशापान करतो.अशा माणसाबरोबर सात जन्म पुन्हा पुन्हा तोच नवरा मिळावा याच्यासाठी महिला का वडाच्या झाडाला फेऱ्या मारतात.! शिकलेल्या सवरलेल्या महिलांना अजूनही का समजत नाही! आणि फेऱ्या मारल्या नंतर तोच नवरा कधी मिळत नसतो. आणि मिळणारही नाही. याकडे त्या बाईने सकारात्मक दृष्टीने वैज्ञानिक दृष्टीने पाहिले पाहिजे की नाही! आज आपण शिकलो आहोत.सावरलो आहोत.तरीही लोक करतात म्हणून आम्ही करत असतो मग माणसात आणि मेंढरात फरक काय? हे झालं ग्रामीण भागातलं आता शहरी भागातला जर विचार केला तर शहरातली पूर्ण वडाची झाडं तुटून गेली आहेत. पैसे मिळतात म्हणून लोक लाखो टन वडाच्या फांद्याची कत्तल करून त्यांची विक्री करतात.याकडे शासन आणि निसर्गप्रेमी यांचे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे. याकडे मी तुमचं लक्ष केंद्रीत करू इच्छितो.नागपूर,सोलापूर, पुणे, मुंबई अशी जी मोठी शहरे आहेत. त्या प्रत्येक शहरांमध्ये, प्रत्येक घरामध्ये एक एक फांदी लोक विकत घेतात. आणि त्याची पूजा केली जाते. विचार करा लाखो घरांच्या मध्ये लाखो फांद्या जात असतील आणि घरात या फांदीची पूजा होत असेल तर एवढी मोठी वृक्षतोड कोण थांबवणार?आज आपण वृक्षतोड थांबवू शकलो नाही तर येणारा काळ आम्हाला माफ करणार नाही. 22 व्या शतकातील जगणारी माणसं तुम्हाला शाप दिल्याशिवाय राहणार नाहीत. चित्रात फक्त वडाच्या झाडाचं नाव शिल्लक राहील. आज डायनासोरच चित्राचं आपण नाव घेतो तसंच.वडाच्याच झाडाची नाहीतर सर्व झाडांची कत्तल होईल. ऑक्सिजन मिळणार नाही. म्हणून माणसं तडफडून मरतील.महिलांनी जरूर वडाच्या झाडाची पूजा करावी पण त्याची रीत बदलावी लागेल. दर वर्षाला याच सना दिवशी प्रत्येक महिलेने एक झाड लावावं.ज्या घरांमध्ये नवरा तेवढाच पवित्र आहे. कमवतो आहे. प्रपंच चालवतो आहे. शिवी देत नाही. बायकोला मारत नाही. लेकरा बाळांना शिकवतो. विशेषता मुलींच्या शिक्षणासाठी जास्त चांगलं काम करतो. गुणवंत, नितीवंत, चारित्र्यसंपन्न असा पुरुष ज्या घरात आहे. त्या घरातल्या महिलांनी जरूर वडाच्या झाडाची पूजा करावी. आणि कोणतं ना कोणतं ऐक झाड ह्या सणाच्या निमित्ताने लावावे. हे केल्याने निसर्ग रक्षण होईल. ही पृथ्वी सुशोभित होईल. ऑक्सिजन भरपूर मिळेल. आणि फळेही भरपूर मिळतील...चला आज एक झाड लाऊ. वटसावित्री पौर्णिमा साजरी करू.

**लेखक:-भूमिपुत्र वाघ**

# MPSC चा ऑनलाईन परीक्षेचा घाट : विद्यार्थ्यांच्या भविष्याचा की 'काळ्या बाजाराचा' उत्सव?




**म**हाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) म्हणजे राज्यातील लाखो कष्टकरी,शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी अंधारात आशेचा किरण दाखवणारी एक पवित्र संस्था.झोपडीतून थेट मंत्रालयाच्या खुर्चीपर्यंतचा प्रवास केवळ आणि केवळ गुणवत्तेच्या जोरावर गाठता येतो,हा विश्वास या लाल दिव्याच्या स्वप्नाने तरुणांच्या मनात जिवंत ठेवला आहे.परंतु,गेल्या काही दिवसात याच MPSC कडून पूर्व परीक्षा 'ऑनलाईन' घेण्याचा जो घाट घातला जात आहे,त्याने या विश्वासालाच सुरुंग लावण्याचे काम केले आहे.स्पर्धा परीक्षांचे मैदान आधीच विविध कारणांनी धगधगत असताना,आता 'ऑनलाईन' नावाचे नवे संकट विद्यार्थ्यांच्या दारात आणून उभे केले जात आहे.हा निर्णय म्हणजे पारदर्शकतेचा आव आणून कोणाच्या तरी घशात टेंडर घालण्याचा आणि पैशाच्या जोरावर श्रीमंतांच्या मुलांना शासकीय खुर्च्या बहाल करण्याचा कुटिल डाव तर नाही ना? असा संतप्त सवाल आता विचारला जाऊ लागला आहे.अलिकडच्या काळातील इतिहास चाळला, तर महाराष्ट्रात 'ऑनलाईन परीक्षा' हा शब्द पारदर्शकतेसाठी नाही,तर 'उघड काळ्या बाजारासाठी' कुप्रसिद्ध झाला आहे.तलाठी भरती असो,टीईटी (TET) असो की म्हाडाची भरती; प्रत्येक ऑनलाईन परीक्षेत घोटाळ्यांचे आणि पेपरफुटीचे जे 'रामायण' घडले,ते संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे.रिमोट ॲक्सेस घेऊन परीक्षा केंद्र मॅनेज करणे,कॉम्प्युटर स्क्रीन हॅक करणे आणि एका रात्रीत गुणवत्तेचा बाजार मांडणे,यात ऑनलाईन माफियांचा हातखंडा तयार झाला आहे.ज्या यंत्रणा साध्या वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या परीक्षा निष्कलंकपणे पार पाडू शकत नाहीत,तिथे राज्याचे वर्ग-१ आणि वर्ग-२ चे अधिकारी निवडणारी MPSC परीक्षा ऑनलाईनच्या हवाली करणे म्हणजे 'माकडाच्या हातात कोलीत' देण्यासारखे आहे.हा इतिहास डोळ्यांसमोर जिवंत असतानाही आयोग जर ऑनलाईन परीक्षेचा अट्टाहास करत असेल,तर हा निर्णय कुणाच्या फायद्यासाठी घेतला जातोय,हे उघड गुपित आहे.MPSC ची परीक्षा ऑनलाईन घेण्यामागे प्रशासनाचा प्रशासकीय सुटसुटीतपणा हा केवळ एक मुखवटा आहे,खरा चेहरा काही वेगळाच असण्याची दाट शक्यता आहे.कोट्यवधी रुपयांची उलाढाल असणारी ही ऑनलाईन परीक्षांची कंत्राटे कोणत्या खाजगी कंपन्यांच्या घशात घालण्यासाठी हा अट्टाहास सुरू आहे? विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कातून गोळा होणारा पैसा खाजगी कंपन्यांचे खिसे भरण्यासाठी वापरला जाणार का?ऑनलाईन परीक्षांच्या या डिजिटल बाजारात गरिबांची मुले केवळ प्रेक्षक म्हणून उरणार का? पैशाच्या जोरावर हायटेक कॉपी करणाऱ्या,लॅब मॅनेज करणाऱ्या 'श्रीमंतांच्या लाडक्या घोड्यांना' थेट अधिकारी बनवण्याचा हा सुप्त अजेंडा तर नाही ना?जर स्पर्धा परीक्षेतून गरिबाच्या,शेतकऱ्याच्या पोराची गुणवत्ता आणि घाम गाळून मिळवलेले यश वजा होणार असेल,तर ही परीक्षा पद्धत लोकशाहीला मारक ठरेल.MPSC परीक्षा देणारा ७० टक्क्यांहून अधिक तरुण हा ग्रामीण भागातील, दुष्काळी भागातील आणि शेतकरी कुटुंबातील आहे.शहरात एसी रूममध्ये बसून संगणकावर सराव करणाऱ्या मुलांची आणि ग्रामीण भागात विजेचा लपंडाव सहन करत,तुटपुंज्या साधनांवर अभ्यास करणाऱ्या मुलांची स्पर्धा कशी होऊ शकते? ऑनलाईन परीक्षेमुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थी या प्रक्रियेतून आपोआपच बाहेर फेकले जातील.हा केवळ परीक्षा पद्धतीतील बदल नाही,तर ग्रामीण गुणवत्तेचा पद्धतशीरपणे केला जाणारा संहार आहे.MPSC ने एक गोष्ट लक्षात ठेवावी,की स्पर्धा परीक्षेचा विद्यार्थी हा केवळ उमेदवार नसतो,तर तो आपल्या कुटुंबाच्या पिढ्यानपिढ्यांच्या दारिद्र्याचा अंधार दूर करू पाहणारा एक 'योद्धा' असतो. त्याच्या स्वप्नांचा आणि कष्टाचा बाजार मांडण्याचा अधिकार कुणालाही नाही."कागदावरचा ओएमआर (OMR) शीटचा काळा ठिपका हा विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देतो,पण ऑनलाईनचा काळा बाजार विद्यार्थ्यांचे संपूर्ण आयुष्यच अंधकारमय करतो."जर आयोगाने या आत्मघातकी निर्णयाचा फेरविचार केला नाही,जर खाजगी कंपन्यांचे हितसंबंध जपण्यासाठी गुणवत्तेचा बळी दिला गेला,तर महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांचा संयम सुटेल.हा आक्रोश केवळ सोशल मीडियावर मर्यादित न राहता,मंत्रालयाच्या उंबरठ्यापर्यंत आणि रस्त्या-रस्त्यांवर तीव्र आंदोलनाच्या रूपाने धडकेल. आयोगाने 'डिजिटल क्रांती'च्या नावाखाली 'भ्रष्टाचाराची नवीन गल्ली' शोधू नये,हीच संपूर्ण छात्रशक्तीची आणि महाराष्ट्राची अपेक्षा आहे.




**विजय म्हस्के पाटील**
**मो.न-९५९५४०११११**
**[छत्रपती संभाजीनगर शहर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ जून २०२६


## नागपूरच्या न्यू एरा हॉस्पिटलवर FDA ची धडक कारवाई



**नागपूर :** रनागपुरातील न्यू एरा हॉस्पिटलच्या मेडिकल स्टोअरवर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई करत, रुग्णालयाच्या बेसमेंटमधून विनापरवाना साठवलेला तब्बल २० लाखांहून अधिक किमतीचा औषधसाठा जप्त केला आहे. संबंधित जागेवर औषध विक्रीसाठी कोणताही वैध परवाना नसल्याचे आढळून आल्याने, तसेच औषधांच्या खरेदी-विक्रीची आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात व्यवस्थापन अपयशी ठरल्याने एफडीएकडून ही धडक कारवाई करण्यात आली. दरम्यान, जप्त केलेल्या औषधांपैकी दोन नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, या प्रकरणात औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

रुग्णांना रुग्णालयाशी संलग्न असलेल्या मेडिकलमधूनच औषधे विकत घेण्यास भाग पाडण्यात येत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना औषधांच्या प्रिस्क्रिप्शनची प्रत दिली जात नसल्याचेही एफडीएच्या तपासणीत समोर आले आहे. रुग्णालयाने संगणकीय प्रणालीद्वारे थेट फार्मसीकडे औषधांची मागणी नोंदवण्याची पद्धत अवलंबल्याचे उघड झाले आहे. या प्रकारामुळे रुग्णांना बाहेरून औषधे घेण्याची मुभा देणाऱ्या एफडीएच्या आदेशाचे स्पष्ट उल्लंघन झाले आहे. शिवाय, 'रुग्णांना औषधे कोठूनही घेण्याचा अधिकार आहे', असा माहिती फलकही रुग्णालयात कुठेही लावण्यात आलेला नव्हता.

औषध विक्रीच्या अनेक नियमांचे सर्रास उल्लंघन या रुग्णालयाकडून करण्यात आल्याचे तपासणीत उघडकीस आले आहे. मेडिकल स्टोअरवर केमिस्ट अँड ड्रगिस्टचा अधिकृत नामफलक लावलेला नव्हता, मुदतबाह्य (एक्स्पायरी डेट संपलेल्या) औषधांसाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था केलेली नव्हती, तसेच 'शेड्यूल H-१' अंतर्गत येणाऱ्या औषधांचा साठा आणि त्याच्या नोंदींमध्ये मोठी तफावत आढळून आली आहे.

एवढेच नाही तर, अनिवार्य असलेले तपासणी पुस्तक (फॉर्म-३५) देखील उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्याने, अन्न व औषध प्रशासनाने रुग्णालयाला 'कारणे दाखवा' नोटीस बजावली असून पुढील कठोर कारवाई प्रस्तावित केली आहे. याच पार्श्वभूमीवर, कोणत्याही रुग्णाला विशिष्ट मेडिकलमधूनच औषधे घेण्याची सक्ती झाल्यास त्यांनी तात्काळ एफडीएकडे तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून तुकाराम मुंढे यांनी राज्यातील भेसळखोरांविरोधात धडक मोहीम उघडली आहे. मंदिर परिसरात खासगी दुकानदारांकडून प्रसादाच्या नावाखाली अत्यंत निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. याची गंभीर दखल घेत, भाविकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे कडक निर्देश आयुक्त मुंढे यांनी दिले आहेत. यासोबतच, दुधातील भेसळ रोखण्यासाठीही प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या या सातत्यपूर्ण आणि आक्रमक कारवाईमुळे शिर्डीसह राज्यातील इतर मंदिर परिसरांमध्ये भेसळयुक्त अन्नपदार्थ विकणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. भाविकांच्या आरोग्याशी केलेला कोणताही खेळ यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा या कारवाईतून देण्यात आला आहे. तसेच, आगामी काळात भेसळखोरांविरोधातील हे धाडसत्र अधिक तीव्र केले जाईल, असे संकेतही प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## ज्ञानज्योती संस्थेतर्फे प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील ज्ञानज्योती संस्थेच्या वतीने मुरूमच्या प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल मधील दहावीच्या बोर्ड परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रविवारी (ता. 28) रोजी सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात आपल्या शाळेचा नावलौकिक उंचावणाऱ्या विद्यार्थ्यांचे समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत कौतुक करण्यात आले. चंद्रशेखर तावडे (प्रथम क्रमांक) व कुमारी समृद्धी खददे (द्वितीय क्रमांक) यांचा पालक, मार्गदर्शक सहशिक्षक जगदीश सुरवसे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी डॉ. विजयकुमार फड, खा. डॉ. ज्योतीताई वाघमारे, माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले, धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, उमरगा चे नगराध्यक्ष किरण गायकवाड, ज्ञानज्योती संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा चौगुले, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, लोहारा नगराध्यक्षा वैशालीताई खराडे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, शिवकुमार बिराजदार, बळीराम सुरवसे, जगन्नाथ पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच, या यशाच्या मागे असलेल्या शिक्षकांचे अचूक मार्गदर्शन आणि पालकांचे अथक परिश्रम यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मिळाली.